# आमदार, हरिभाऊ राठोड यांची काल्पनिक मुलाखत
# ओबीसीचे विभाजन कशासाठी ? कोणासाठी ?

**पत्रकार :-** ओबीसीच्या आरक्षणाचे विभाजन कशासाठी व कोणासाठी थोडक्यात स्पष्ट करा ?

**हरिभाऊ राठोड :-** मंडल आयोगाच्या शिफारशी प्रमाणे ओबीसींना २७% आरक्षण केन्द्रानी दिले आहे. केंद्रीय ओबीसीच्या यादीमध्ये भटक्या विमुक्त आणि बारा बलुतेदार आणि इतर अत्यंत मागासजातींचा समावेश आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, गेल्या २२ वर्षामध्ये मंडल आयोग लागू झाल्यापासून या भटक्या विमुक्त आणि बारा बलुतेदार या सारख्या जातींना त्याचा लाभ मिळालेला आहे. उदा : आय ए एस, आय पी एस, आय आर एस, पोस्ट ऑफिस, रेल्वे, राष्ट्रीयकृत बँका केंद्रीय कार्यालयात इत्यादी आणि म्हणून महाराष्ट्र आणि आंध्र प्रमाणे राज्यात केलेल्या विभाजनाप्रमाणे केंद्रातही विभाजन आवश्यक झालेले आहे. हे विभाजन भटक्या विमुक्त बारा बलुतेदार म्हणजेचे न्हावी, खाती, वाडी, लोहार, सुतार, सोनार, कुंभार, धोबी, रामोशी, गुरव, तांबोळी, वाणी, कासार, भाट, जिनगर, सनगर, बुरड, शिंपी, गोवारी, डवरी-गासोवी, कोष्टी, विनकर, बेलदार, कुमावत, भोई, केवठ तथा कोळी, माळी, तेली, धनगर या अतिमागासांना होणार आहे. या साठी देशभर आंदोलन करणार आहोत.

**पत्रकार :-** आंदोलन केव्हा आणि कुठे करणार ?

**हरिभाऊ राठोड :-** दिनांक २७ मार्च २०१६ रोजी जंतरमंतर दिल्ली येथे करणार.

**पत्रकर :-** मंडल आयोगाच्या शिफारशी प्रमाणे ज्यांच्यासाठी आरक्षणाचा लढा लढत आहात त्यांची आरक्षणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ? अणि विभाजन झाल्यास किती लोकांना लाभ मिळेल ?

**हरिभाऊ राठोड :-** भटक्या विमुक्तांच्या देशभरातील ६६६ जाती आणि (जवळपास २२ करोड) बाराबलुतेदार आणि इतर अत्यंत मागास ५४० (जवळपास १८ करोड) या एकु ण जवळपास १२०६ (म्हणजेच एकुण ४० करोड) जातींना लाभ मिळेल. सद्यस्थितींमध्ये ओबीसीचे केंद्रीय आरक्षण २७% आहे.

**पत्रकार :-** या सर्व जातींना २७% आरक्षण असतांना आणखी आपण कशासाठी आरक्षण मागत आहात ?

**हरिभाऊ राठोड :-** आम्हाला ओबीसीचे २७% आरक्षण नको आहे तर, फक्त आम्हाला ९-९% आरक्षण हवे आहे. यासाठी आम्ही ओबीसीचे ३ ठिकाणी विभाजन करावे अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातुन करणार आहोत.

**पत्रकार :-** असे कां ? जेव्हा तुम्हाला २७% आरक्षण असतांना ९-९% आरक्षण का मागता?

**हरिभाऊ राठोड :-** कारण २७% आरक्षणाचा या लोकांना लाभ मिळत नाही. याचे कारण असे आहे की, इतर मागासवर्गाच्या केंद्रीय यादीमध्ये काही उच्चभ्रु सुधारलेल्या जातींचा समावेश असल्यामुळे ते आरक्षण हे फस्त करीत आहे. व या वंचितांच्या पदरी काही पडत नाही.

**पत्रकार :-** अनेक दिवस आपण एसटी, (अनु.जमातीची) मागणी करीत होतात आणि आता...

**हरिभाऊ राठोड :-** हो, हे खरे आहे. ही मागणी आम्ही मागत राहणार परंतु ते आता कदापि ही मंजुर होईल असे दिसत नाही. कारण लोकसभेमध्ये जवळपास ४० खासदार हे आदिवासी समाजोच बसले आहेत. व ते ही मागणी मंजूर होऊ देणार नाही. यापूर्वीही इंदिराजी गांधी यांनी १९६७, १९७२ साली आणि १९७६ साली संसदेत बिल आणले होते . त्यावेळेस सर्व आदिवासी समाजातील खासदारांनी खासदारकीचा राजिनामा इंदिराजी गांधी यांच्या अंगावर फेकला होता, हाच खरा आरक्षणाचा इतिहस आहे.

**पत्रकार :-** राज्यातील आरक्षणाची काय परिस्थिती आहे ?

**हरिभाऊ राठोड :-** काही राज्यांनी या आधिच अशा पध्दतीने आरक्षणाचे विभाजन केले आहे. उदा. महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशने यापूर्वीच भटके विमुक्त समजाला वेगळे आरक्षण देउन त्यांना सामाजिक न्याय दिला आहे. आणि काही राज्यामध्ये हा प्रश्न विचाराधिन आहे. उदा. मध्यप्रदेश, उत्तरांचल. ज्या राज्यांनी अजुन ओबीसीचे विभाजन केले नाही त्या सर्व राज्यांना महाराष्ट्र पॅटर्न (वसंतराव नाईक) राबवावे अशी आमची आजही मागणी आहे. दिल्ली जनआंदोलनासोबतच आम्ही इतर राज्यातही या आरक्षणाचा लढा उभारणार आहोत.

**पत्रकार :-** आपण २७% आरक्षणाचे विभाजन मागता आहात हे संविधानीकरित्या वैध आहे का?

**हरिभाऊ राठोड :-** होय, कारण सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहाणी विरुध्द भारत सरकार (१९९३) या प्रकरणात असे स्पष्ट केले आहे की, इतर मागासवर्गीयाचे आरक्षणाचे विभाजन केल्यास ते न्यायोजित होईल व संविधानीकरित्या वैध राहिल.

**पत्रकार :-** आपण ओबीसीचे विभाजन मागत आहात परंतु महाराष्ट्रात भटके-विमुक्त असा स्वतंत्र प्रवर्ग निर्माण केला आहे. तुम्ही केंद्रात सुध्दा अशीच मागणी कराल का ?

**हरिभाऊ राठोड :-** होय, विभाजनाच्या ए.बी.सी. चा अर्थ १) शेडयुल डि एन टी (डेनोटीफाईड नोमॅडी टाईप्स) २) शेडयुल एम बी सी (अतिमागास बाराबलुतेदार वगैरे) ३) शेडयुल बी सी असे प्रवर्ग निर्माण होतील मागेपुढे या प्रवर्गाला एसटी (अ), असे सुध्दा म्हणता येईल.

**पत्रकार :-** हरिभाऊजी काही राज्यामध्ये भटक्या विमुक्त समाजातील काही जाती एस सी मध्ये आहे आणि काही एस. टी मध्ये सुध्दा आहे. मग त्या जातीचा समावेश कुठे होईल ? हे स्पष्ट करा.
**हरिभाऊ राठोड :-** ज्या जाती एस सी मध्ये आहे किंवा एस. टी मध्ये आहे त्यांना जे आरक्षण मिळतआहे तेच मिळत राहिल कारण या ठिकाणी त्यांचा प्रश्नच उद्भवत नाही आपण केंद्रीय ओबीसीमध्ये असलेल्या जातीचाच विभाजन व्हावे अशी मागणी करीत आहो. आणि एन सी बी सी (राष्ट्रीय मागसवर्गीय आयोग) यांनी सुध्दा ओबीसी चाच विभाजनाचा अहवाल सादर केला आहे.

**पत्रकार:-** आपल्या या मागणीला आणखी आधार काय आहे ?

**हरिभाऊ राठोड :-** आरक्षण देण्याबाबतच्या धोरणाविषयी आरक्षणाची प्रणेते छत्रपती शाहु महाराज आणि संविधान रचियेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन घोडयाचे (एक सशक्त व अशक्त) याचे उदाहरण दिले होते. जर या दोन्ही घोडयांना एका टोपलीमध्ये चणे खावयास दिल्यास सशक्त घोडा सर्व चणे खाईल व अशक्त घोडयाच्या वाटयाला काहीच मिळणार नाही. असेच आज भटक्या विमुक्त बाराबलुतेदार आणि धनगर, माळी, कोळी, तेली, गोवारी यासारख्या जातीच्या बाबतीत घडत आहे.दुसरे असे की, मंडल आयोगाचे एक सदस्य श्री. एल.आर.नाईक यांनीही मंडल आयोगाच्या शिफारशी सरकारला देतांना सरसकट २७% आरक्षणाला विरोध केला होता आणि २७ टक्के आरक्षणाचे दोन भाग करा अशी शिफारस केली होती. परंतु त्यावेळेस इतर सदस्यांनी त्याचे म्हणने मान्य केले नाही. मंडल आयोगाच्या ऐतिहासिक अहवालासोबत श्री. एल.आर.नाईक यांचे असहमीतपत्र जोडले आहे. आणि ही फार ऐतिहासिक बाब आहे. सरकारला या दबलेल्या आणि वंचीत घटकाला न्याय देण्यासाठी श्री. एल.आर.नाईकांची डिसेन्ट नोट मा. सर्वोच्च न्यायालयाचे इंद्रा सहाणी प्रकरणी केलेले भाष्य आणि नुकतेच राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष, जस्टीस ईश्वरय्या यांनी केलेली शिफारस आणि त्यांचा अहवाल पुरेसा आहे. अधिक माहितीसाठी श्री. एल.आर.नाईक डिसेन्ट नोट सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासंबंधी उतारा आणि राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अहवालाची शिफारस याचे अवलोकन करावे. व तसेच आमच्या www.haribhaurathod.org या संकेतस्थळास भेट दयावी.

**एल.आर.नाईक डिसेंन्ट नोटबद्दल थोडक्यात मत व्यक्त करा.**
त्यांचे मत असे होते की २७% आरक्षण सरसकट न देता राज्यांच्या या मागासवर्गीयांच्या यादीचे विभाजन करावे एक मागासवर्गीय व दुसरे दबले गेलेले मागासवर्गीय म्हणजेच प्रगत मागासवर्गीयांच्या तुलनेत अत्यंत मागासलेले वर्ग, परंतु आयोगाच्या सदस्यांपैकी बहुतेकांनी श्री. नाईक यांचे मत मान्य केले नाही. मंडल आयोगाचे सन्माननीय सदस्य श्री एल.आर.नाईक यांच्या मताकडे फारसे कुणाचेही लक्ष गेले नाही या अहवालामध्ये श्री. नाईक यांनी असे मत व्यक्त केले

होते की ओबीसीमधील पुढारलेल्या जाती ओबीसीमधीलच मागे पडलेल्या जातींना पुढे येवू देत नाही त्यामुळे भविष्यात हे अत्यंत मागासलेल्या व अत्यंत टोकाच्या मागासलेल्या जाती संघटीत होतील व आपले नेतृत्व आपणच निर्माण करतील परंतु जर असे झाले नाही तर ओबीसीमधील अत्यंत मागासलेला वर्ग व विमुक्त भटक्या जाती व दबलेले मागासवर्ग केंद्रीय आरक्षणाचा लाभ उठवु शकनार नाहीत. महाराष्ट्र मध्ये टाटा इंन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स यांच्या तसेच योजना आयोगाच्या शिफारशी नुसार १९६१ मध्ये ओबीसीना विभागुन आरक्षण दिले आहे. याचा विमुक्त व भटक्या जातींनी थोडा फार महाराष्ट्रात फायदा घेतला आहे व आजही घेत आहे.

**इंद्रा शहाणी प्रकरण थोडक्यात सांगा**

मंडल आयोगाच्या शिफारशी नुसार २७% आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा शहाणी विरुध्द भारत सरकार या खटल्यामध्ये असे म्हटले आहे की, घटनेच्या कलम १६ (४) या तरतुदीसाठी मागासवर्गीयांचे मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे वर्गीकरण करण्यात घटनेचा कोणताही अडथळा नाही असे वर्गीकरण हे सामाजीक दृष्टया किती मागासलेपण आहे त्यावर अवलंबुन असावे. विविध मागासवर्गीय यामध्ये समान वाटप होणे हे आवश्यक आहे की, ज्या योगे एकत्रीकरण होवून एक वा दोन वर्ग आरक्षणाचा सर्व वाटा स्वतःच घेऊन जाणार नाही.

सदर खटल्याच्या निकालाच्या ८०२ या परिच्छेदामध्ये माननीय न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की, मागासवर्गीयांचे, मागासवर्गीय वअधिक मागासवर्गीय असे वर्गीकरण करण्यात घटनेचा किंवा कायद्याचा कोणताही अडथळा नाही. असे वर्गीकरण केलेच पाहिजे असा आग्रह ते धरत नाहीत. मात्र प्रश्नाचे उत्तर देतांना ते इतकेच म्हणतात की, असे वर्गीकरण केल्यास ते वैध होईल. माननीय न्यायाधीशांनी दोन व्यावसायिक गटांचे उदाहरण दिले आहे. सोनार व वडार (पारंपरिकरित्या दगड फोडणार) जर या दोघांनाही एकाच वर्गात घातले तर सोनारच सर्व सवलती लाटतील व वडारांना काहीच राहणार नाही. त्यामुळे शक्य असल्यास राज्य सरकारने इतर मागासर्वीयामध्ये सुध्दा वर्गीकरण करावे की ज्यामुळे मागासवर्गीयातील अधिक मागासवर्गीयांनाही त्यांचा देय असलेले लाभ मिळतील.

**राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग दिल्ली यांची नेमकी काय शिफारस आहे ?**

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग दिल्ली यांनी दिलेल्या अहवालानुसार केंद्रीय ओबीसीचे तिन भागात विभाजन करावे अशी शिफारस केली आहे. १) भटके विमुक्त २) बारा बलुतेदार व अति मागासामधील तेली, माळी, कोळी, गोवारी ३) इतर मागास (इतर ओबीसी) असे विभाजन २७% आरक्षणाचे करावे अशी शिफारस केली आहे. आणि गेले २० वर्ष आमची विभाजनाची तिच मागणी आहे.